## 'आयसीडब्ल्यूएआय'चे अधिवेशन

# विकासप्रक्रियेत सर्व घटक हवेत

## रवी चोप्रा यांचे मत : सर्वांगीण विकासाशिवाय आर्थिक सुधारणा अपूर्ण

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २९ : समाजाच्या सर्व स्तरांतील घटकांना विकासप्रक्रियेत सामावून घेतले, तरच त्याला सर्वांगीण विकास म्हणता येईल. मात्र, भारत अशा प्रकारच्या विकासापासून दूर आहे. सर्वांगीण विकास न झाल्यास आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमावर परिणाम होऊ शकतो, असे मत 'पियाजिओ व्हेइकल्स'चे अध्यक्ष रवी चोप्रा यांनी गुरुवारी येथे व्यक्त केले.

'दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंटंट्स ऑफ इंडिया'च्या (आयसीडब्ल्यूएआय) सुवर्णमहोत्सवी अधिवेशनाचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून चोप्रा उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष कुणाल बॅनर्जी, अधिवेशन समितीचे अध्यक्ष संजय भार्गवे, 'डब्ल्यूआयआरसी'चे अध्यक्ष अशोक नवाल आदी याप्रसंगी उपस्थित होते. चोप्रा म्हणाले, ''भारतात श्रीमंत आणि गरीब यांमध्ये दरी असून, ती वाढत आहे. सर्वांगीण प्रगती साधायची असेल, तर सर्व स्तरांचा विचार करावा.''

डॉ. कोळस्कर म्हणाले, ''आयसीडब्लूएआयसारख्या संस्थांनी नव्या उद्योजकांना मार्गदर्शन करायला हवे. नियोजन व धोरणांचा विचार करताना सरकारला मदत करायला हवी.''

**चर्चासत्र, परिसंवाद**

उद्घाटन समारंभानंतर झालेल्या 'रोडमॅप टू ग्रोथ इन प्रेझेंट सिनॅरिओ' या विषयावरील चर्चासत्रात डॉ. वाय. के. भूषण व प्रा. व्ही. एस. दाते यांनी भाग घेतला. 'इन्क्लुझिव्ह ग्रोथ' अर्थात 'सर्वांगीण विकास' या विषयावरील उद्योजकांच्या परिसंवादात सकाळ मीडिया ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार, 'मॅट्रिक्स कन्सल्टंट्स'चे व्यवस्थापकीय संचालक आनंद करंदीकर, सिनेक्रॉन प्रा. लि.चे तन्वीर सौलत; तसेच व्यवस्थापनतज्ज्ञ डॉ. मृत्युंजय अत्रेय व व्यवस्थापन सल्लागार शैलेश सेठ सहभागी झाले होते.